महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९३८५९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

**अधिसूचना क्रमांक :एनओटी-३६१७/सीआर-१३०/२०२२/ जाहिरात** दिनांक : २४ एप्रिल, २०२३

## -: शुद्धिपत्रक :-

**विषय :- राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२२ (जाहिरात क्रमांक - ०९९/२०२२)**
**सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब संवर्गाच्या पदभरतीबाबत**

महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांच्या मागणीनुसार महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्य सेवा मुख्य परीक्षा-२०२२ (जाहिरात क्रमांक ०९९/२०२२) मधून भरावयाच्या विविध २३ संवर्गाकरीता दिनांक ११ नोव्हेंबर, २०२२ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे.

**२.** पदे विज्ञापित झाल्यानंतर शासनाच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या दिनांक ०५ एप्रिल, २०२३ रोजीच्या पत्राद्वारे शिधावाटप यंत्रणेतील सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब संवर्ग एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये अंतर्भूत नसल्याचे कळविण्यात आले आहे. यास्तव, राज्य सेवा परीक्षा २०२२ च्या भरतीप्रक्रियेतून सहायक नियंत्रक शिधावाटप, गट-ब संवर्गाकरीता शिफारसपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची शिफारस आयोगाकडून सामान्य प्रशासन विभागाऐवजी अन्न व नागरी पुरवठा विभागाकडे करण्यात येईल.

**३.** पदसंख्येत/आरक्षणात वाढ/बदल झाल्यास याबाबतचा तपशील वेळोवेळी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**४.** अधिसूचनेतील इतर अटी व शर्तीमध्ये कोणताही बदल नाही.

सहसचिव, जाहिरात
महाराष्ट्र लोकसेवा आयोग